REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 9 | JUNE - 2023

# घोर नृत्य - वारली आदिवासी पुरुषांचा सामुदायिक नृत्य प्रकार

कु. सांगोलकर एम.वी. आणि डॉ.तुकाराम नारायण शिंदे
एम.ए.सेट, पीएच.डी.
इतिहास विभाग प्रमुख,
ए.आर.बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

**गोषवारा:**



भारतीय संस्कृती ही विविधतेतून नटलेली आहे. या भारतीय संस्कृतीचा मूळ प्रवाह असलेल्या आदिवासी संस्कृतीत ही विविधता दिसून येते. नृत्यकला, चित्रकला, लोकगीते, सण-उत्सव ही आदिवासी जमातीची वैशिष्टचे आहेत. निसर्गाच्या सानिध्यात राहत असलेल्या आदिवासी जमातींच्या करमणूकीसाठी, मनोरंजनासाठी तसेच आनंद, दु:ख, यांसारख्या भावना व्यक्त करण्याचे नृत्यकला हे प्रमुख साधन आहे. आदिवासी लोक हे देवाला प्रसन्न करण्यासाठी तसेच ऋतुमानानुसार नृत्य करतात. नृत्यकला ही प्रदेश, विभागानुसार तसेच त्यांच्या विविध जमातीनुसार स्वत:चे वैशिष्टच दर्शविणारी असते. वारली आदिवासी जमातीत नृत्याला जे स्थान आहे ते इतर आदिवासी जमातीत दिसून येत नाही. वारली आदिवासी जमातीत तारपा, कामड, घोर अशा प्रकारे नृत्यांचे प्रकार आहेत. नृत्य हे सामुदायिक प्रकारचे असतात व स्त्री-पुरुष दोघेही या नृत्यांमध्ये सहभागी होतात. परंतु 'घोर नृत्य' किंवा नाचात फक्त पुरुषच सहभागी असतात. या नृत्याला 'टिपरी' किंवा 'दांडी नृत्य' असेही म्हणतात. अशा या आदिवासी जमातीचे वैशिष्टच असलेल्या नृत्य व लोकगीतांचे संवर्धन व जतन करणे हे आपले कर्तव्य आहे.

**परिचय:**

आदिवासी संस्कृती ही भारतीय संस्कृतीचा मूळ प्रवाह आहे. यामध्ये काही बदल होऊन भारतीय संस्कृतीचा उदय झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. महाराष्ट्रात एकूण ४७ जमाती आहेत. महाराष्ट्रात आदिवासी जमातीचे तीन विभागात विभागणी करण्यात आली आहे.
अ) सह्याद्री विभाग ब) सातपुडा विभाग क) गोंडवना विभाग / विदर्भ अशाप्रकारे विभागणी करण्यात आली आहे.
**अ) सह्याद्री विभाग** सह्याद्री पर्वताच्या विभागात महादेव कोळी, वारली, कोकणा ठाकर, कातकरी, मल्हार कोळी या जमातींची वस्ती आढळते. त्यात नाशिक, अहमदनगर, पुणे, रायगड, ठाणे या जिल्हयांचा समावेश होतो. महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येत हे प्रमाण ३८ टक्के आहे.

**ब) सातपुडा विभाग** सातपुडा पर्वताच्या रांगामध्ये भिल्ल, कोकणा, गावित, दुबळा, कोरकू, धानका, तडवी, पावरा या जमाती राहतात. या विभागात धुळे, नंदूरबार, जळगाव, औरंगाबाद, अमरावती या जिल्हयांचा समावेश होतो.त्यांची लोकसंख्या ३३ टक्के आहे.

**क) गोंडवना विभाग / विदर्भ** विदर्भातील डोंगराळ आणि जंगल विभागात विशेषतः चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, नागपूर या जिल्हयात गोंड-माडिया गोंड, कोरकू, कोलम, परधान, आंध या जमाती राहतात. त्यांची लोकसंख्या २९ टक्के आहे.[१]

भारताच्या राज्यघटनेतील कलम ३४२ (१) अन्वये राष्ट्रपती एखाद्या जमातीचा अनूसचित जमातीत समावेंश करु शकतात किंवा काढू शकतात.

आदिवासी किंवा आदिम समाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाला विचारवंत, अभ्यासक्रम प्रशासक व सामाजिक कार्यकर्ते यांनी विविध नावे दिलेली आहे. रिसले, लॅस्सीन, एल्विन, ग्रिगसन, शूबर्न, टॅलेंट, सेडविक, मार्टिन, ए.व्ही.ठक्कर यांनी या लोकांना अगदी प्राचीन (Aboriginal) किंवा मूळचे रहिवाशी (Aboriginè) म्हटले आहे. 'आदिम अगर आदिवासी' (Primitive Tribes) असे नामाभिधान हटनने केले आहे. डॉ.धुर्ये यांनी त्यांना तथाकथीत मूळचे रहिवासी (So Called Aborigines) व मागसलेले हिंदू (Backward Hindus) असे म्हटले आहे. पण भारतीय राज्यघटनेने त्यांना 'अनुसूचित जमात' (Schedule Tribes) असे म्हटले आहे. हा उल्लेख डॉ.धुर्ये यांना मान्य आहे.[२]

आदिवासी समाज म्हणजे 'अतिप्राचीन समाज' किंवा अतिशय अप्रगत व मागासलेला समाज असे समीकरण करणे चुकीचे आहे. मानवशास्त्रज्ञांनी वैज्ञानिक पद्धतीने आदिवासी समाजाच्या व्याख्या करून आदिवासी समाजविषयीचे चुकीचे ग्रह तर दूरच केलेच पण त्याचबरोबर आदिवासी कोणाला म्हणावे याही प्रश्नाचे उत्तर दिले आहे. याचसाठी विविध मानवशास्त्रज्ञांनी व अभ्यासकांनी आदिम समाजाच्या केलेल्या व्याख्या विचारात घेणे आवश्यक आहे.

### १. गिलिन व गिलिन यांच्या मते :

"एका विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या, समान बोलीभाषा, बोलणाऱ्या व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात."

### २. डब्ल्यू. जे. पेरी :

यांनी आदिवासी समाजाची कमीतकमी वैशिष्टचे सांगितलेली आहेत ते म्हणतात. "समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच समान भू-प्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिम समाज किंवा आदिवासी असे म्हणतात."

### ३. डॉ.रिव्हर्स :

ज्या समूहातील सदस्य एक समान बोलीभाषा बोलतात. युद्ध वगैरे सारख्या उद्दिष्टपूर्तीकरीता एक होऊन झटतात. अशा सरळ व साध्या सामाजिक समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात.

### ४. इंपिरिअल गॅझेटमध्ये :

आदिवासींची व्याख्या, खालील प्रमाणे केली आहे. "समान बोलीभाषा बोलणाऱ्या एकाच भू-भागात राहणाऱ्या, सुरुवातीला अंतर्विवाही असल्याची शक्यता असलेल्या पण सर्वासामान्यपणे अंतर्विवाह नसलेल्या व समान नावे धारण करणाऱ्या कुटूंबाच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात."[3]

नृत्य संगीताच्या धुंदीत जीवनात आंनद भरीत राहण्याचा मार्ग आदिवासींना त्यांच्या संस्कृतीने दिला आहे. भारतात अनेक आदिवासी जमाती आहेत. प्रत्येक जमातीचे स्वतःचे वैशिष्टच दर्शवणारे नृत्यही असते. लोकनृत्यांची ही आवड आजची किंवा अलीकडील काळातील नाही. जगज्जेता सिकंदराबरोबर आलेल्या 'आरेन' या इतिहासकाराने आपल्या नोंदीत भारतीय लोकनृत्यानंतर टिपणे लिहिली आहेत. त्याने लिहून ठेवले आहे. "जगात भारताइतकी नृत्ये आणि गाणी (संगीत) यांची दुसऱ्या कोणत्याच देशात नाही."आरेन यांनी दिलेला हा निर्वाळा आजही सत्य आहे. ५ काही नृत्यांचा उगम धार्मिकतेतून झाला आहे. आदिम मानवाची धारणा अशी

होती की, त्यांना ही नृत्ये त्यांच्या 'मोठ्या देवाने' दिली, शिकविली आदिवासी लोक वाङ:मयात याला अनेक आधार सापडतात.[६]

निसर्गाच्या चिरसान्निध्यात राहत असल्यामुळे त्यांच्या जीवनात निसर्गाची कळत न कळत तादाम्त्य पावता येते. जंगलात वस्ती, दऱ्याखोऱ्यांतून फिरणे विविध प्रकारची पाने, फुले हिंस्त्र श्वापदे किंवा निरूपद्रवी प्राणी यांची संगती यामुळे त्यांचे देव, त्यांची लोकगीते, त्यांचे श्रृंगार या सर्वांवर या सभोवतालच्या निसर्गाचा ठसा उमटलेला दिसतो. या निसर्गापासून मिळणाऱ्या साधन सामग्रीतून आपले कौशल्य वापरून निरनिराळी साधने, उपयुक्त-वस्तू, क्वचित काही कलाकृती ते तयार करतात आणि त्यातून आपल्या जीवनात आनंद निर्माण करतात.७ वारली जीवनात नृत्याला जे स्थान आहे ते इतर कोणत्याही समाजात नसेल. त्यांचे नृत्य नेहमी सामुदायिक असते. वैयक्तिक नृत्याची प्रथा या समाजात आढळून येत नाही. त्याचे एक वैशिष्टचे म्हणजे नृत्यात स्त्री आणि पुरुष दोघेही मनमोकळेपणाने भाग घेतात. वारली लोक दिवाळी, शिमगा यांसारखे सण, नारनदेवाची पूजा वगैरे सारखी विधी लग्नासारखे समारंभ साजरे करीत असताना वेगवेगळ्या प्रकारची नृत्ये करतात. दिवाळी आणि नारनदेवाची पूजा यावेळेची नृत्ये विशेष कलापूर्ण आणि प्रेक्षणिय असतात.[८] आदिवासी नृत्याची उत्पत्ती कशाप्रकारे झाली त्यासंदर्भाने काही संशोधकांची मते महत्त्वपूर्ण ठरतात.

### १. डॉ.गोविंद गारे:

आदिवासी नृत्याच्या संदर्भात ते 'आदिवासी कला' या ग्रंथातच असे म्हणतात की, "काही नृत्याचा उगम धार्मिकतेतून झाला आहे. आदिम मानवाची धारणा अशी होती की, त्यांनाही नृत्ये त्यांच्या मोठ्या देवाने दिली, शिकविली आदिवासी लोकवाङमयात याला अनेक आधार सापडतात."

### २. रेवाबहन तडवी, एवं शंकरभाई तडवी :

'नृत्य का काल या समय आदिमानव की उत्पत्ती है, यही कहाँ जा सकता है। प्राचीन काल मे मानव को जब शिकार हाथ लगता था तो हाथ पैर हिलाकरही वह अपनी खुशी व्यक्त करता था द्य खुशी के मारे वे गोल गोल घुमकर नृत्य जैसा भाव उत्पन्न करते थे। आदिवासी में नृत्य का जन्म भी इसी तरह से हुआ होगा द्य नृत्य का तरह से अपने द्वारा प्रदर्शन भी मानव चेष्टा का ही एक रूप है।

आदिवासी नृत्यांची, कलांची जी निर्मिती झाली आहे. त्याचे जतन संवर्धन करायला पाहिजे. भारतीय राज्यघटनेतील भाग (प्ट) मध्ये राज्यधोरणची मार्गदर्शक तत्वे आहेत त्यात १९७६ मध्ये ४२ व्या घटना दुरुस्तीने मुलभूत कर्तव्य समाविष्ट करण्यात आले आहे. ही मूलभूत कर्तव्ये भाग (IV) मधील ५१ (A) यामधील (f) या मुलभूत कर्तव्यात असे सांगण्यात आले आहे की, आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारंशांचे मौल जाणून तो जतन करणे हे आपले कर्तव्य आहे. लोकनृत्य म्हणजे लोकांनी एकत्रित, उत्साह, आनंद, जोश, ताल, नाद यांच्या स्फूर्तीने केलेले नृत्य म्हणजे लोकनृत्य होय.

वारली आदिवासी जमातीला समृद्ध व वैविध्यपूर्ण परंपरा लाभली आहे. ती नृत्य कलेची नृत्यकला ही दैनंदिन जनजीवन, रूढी, परंपरा, सण-उत्सव यांच्या माध्यमातून तिचा जन्म झालेला आहे. भारतीय परंपरेने नृत्याचा जन्मदाता भगवान-श्रीशंकरांना मानले आहे. वारली आदिवासी जमातीत नृत्यकला ही त्यांचे वैशिष्टच आहे.

### • घोर नृत्य :

पावसाळा संपला की घोर नृत्याची तयारी सुरु होते. घोर नृत्यास टिंपरी नृत्य असेही म्हणतात. या नृत्यात हातात टिपऱ्या घेऊन अत्यंत कौशल्याने हे नृत्य केले जाते. हे नृत्य सरावाशिवाय करता येत नाही. घोर हे पारंपारिक वाद्य असून लोखंडी सळईच्या रिंगणात घुंगरू, गुंफून निर्मिलेले वाद्य हाताच्या मुठीत घेऊन वाजविले जाते हे नृत्य पुरूषांसाठी किंवा पुरुषप्रधान नृत्य आहेकृ

- **घोर नृत्याचा पोशाख :**

या घोर नृत्यामध्ये फक्त पुरूषच नाचतात. त्यांचा पोशाख विशिष्ट प्रकारचा असतो. यामध्ये कमरेस तोकडे धोतर व डोक्यावर विशिष्ट पद्धतीतील लाल रंगाचे पागोटे किंवा पगडी असते. कमरेस मोठे घुंगरू असते. तसेच गळ्यात झेंडूच्या फुलांच्या माळा घालतात.

हा नाच प्रथम रेमटी घेऊन नाचतात. यावेळी मुख्य गाणारा हा मध्यभागी उभा असतो व इतर नाचणारी मंडळी त्याच्याभोवती गोलाकाराने नाचतात यामध्ये मध्यभागी थांबलेल्या प्रमुखास 'कव्या' असे म्हणतात. नाचणारी सर्व मंडळी कव्याभोवती नाचतात व त्याच्या हातात एक घुंगरू लावलेली काठी असते व तो गाण म्हणताना काठी आपटतो व इतर नाचणारी मंडळी हारे हाँ भाई हारे हाँ भाई अशा एका सुरात त्याला साथ देतात.

- **घोर नाचाची गाणी:**

(१)

काले गाऊलीचे शेणा ग ये वाहने गंग पाणी ग,
कोणी तरी सारवण घाली गई सुर्याची किरणापत ग,
कोणी तरी सारवण घाली गई चांदाची रोहनापत ग,
कोणी तरी सारवण घाली गई मेघाची गजपत ग,
कोणी तरी सारवण घाली गई नारानाची लखमापत ग,
कोणी तरी सारवण घाली गई हिरोबाची तुलसापत ग,
कोणी तरी सारवण घाली गई चितोबाची गिरजापत ग,

(अर्थ : काळ्या गाईचे शेण व गंगचे पाणी घेऊन सूर्याची किरणापत, चंद्राची रोहणापत, मेघाची गजपत, नारानाची, लेखमापत, हिरोबाची तुकसापत, चितोबाची गिरजापत सारवण घालीत आहे.)[९]

(२)

हलो जी हलो जी,
हलू हलू तुम्ही नाचा रे भाय ।। धृ. ।। हारे हां बाय,
आली टोली तुम्ही चुकू नका ।। धृ. ।। हारे हां बाय,
टिपऱ्यावर टिपरा मार जोरे भाय ।। धृ. ।। हारे हां बाय,
मोठयाचा घर हाय रे भाय ।। धृ. ।। हारे हां बाय,
आब्रूचा काम हाय रे भाय ।। धृ. ।। हारे हां बाय

(अर्थ : प्रमुख गाणारा म्हणतो दृ हा पाहा, सावकाशपणे नाचा, टिपऱ्यांचा फटका चुकवू नका, टिपऱ्यावरच टिपरे मारा, आपण मोठमोठयांकडे जाणार आहोत व ते आपला नाच पाहणार आहेत. अशावेळी हे अब्रुचे काम असल्यामुळे आपली अब्रु कोणी घालवू नका.)[१०]

या घोर नृत्याला 'दांडी नृत्य' असेही म्हणतात. या नृत्यात प्रत्येक नाचणाऱ्याच्या हातात टिपऱ्या असतात. हे नृत्य वारली, मल्हारकोळी व कोकणा आदिवासी समाजात देखील केला जातो. हे नृत्य सर्व गावांमध्ये होत नाही. आदिवासींच्या जीवनात सामुदायिक नृत्याला जे अनन्य साधारण महत्त्व आहे. असे इतर दुसऱ्या कोणत्याही समाजात नसेल[११]. या नृत्यात स्त्री-भाग घेत नसल्यातरी ते या नृत्याचा आनंद लुटतात. नृत्यामध्ये स्त्री-पुरुष दोघेही मनमोकळे पणाने भाग घेतात.

आदिवासींची निराळी संस्कृती असली तरी तिचे सण-उत्सव, रूढी, परंपरा हे त्यांचे वैशिष्टच आहे. आदिवासी संस्कृती ही अनेक विविधतेतून वैशिष्टचपूर्ण नटलेली आहे. आदिवासींच्या प्रत्येक सण-उत्सवात नृत्याला मुख्य स्थान आहे. पूर्वजांच्या व देवतेच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून अनेक सण-उत्सव साजरे केले जातात. अशा या आदिवासी नृत्याचे व संस्कृतीचे जतन करणे, संवर्धन करणे हे आपले कर्तव्य आहे.

**तळटिपा :**


१. डॉ.गारे गोविंद, सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी, प्रकाशक आदिम साहित्य, ए/५०२, माऊंट वर्ड प्रिस्टिन चिखलवाडी, खडकी रेल्वे स्टेशन, पुणे - ४११०२० पृष्ठ क्र.१९

२. डॉ.गारे गोविंद, सह्याद्री दऱ्याखोऱ्यातील ठाकर आदिवासी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १

३. नाडगोंडे गुरुनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - १९७९, पृष्ठ क्र. २

४. डॉ.गारे गोविंद, सोनवणे उत्तमराव, आदिवासी कला, गमभन प्रकाशन, पृष्ठ क्र.१७

५. कित्ता, पृष्ठ क्र. १७

६. कित्ता, पृष्ठ क्र. १९

७. डॉ.गारे गोविंद, वारली चित्रसंस्कृती, श्री विद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ९

८. कित्ता, पृष्ठ क्र. ९

९. कित्ता, पृष्ठ क्र. १६

१०. डॉ. कवठेकर किरणकुमार, आदिवासी लोकनृत्ये संकल्पना, स्वरूप व वैशिष्टये, अक्षय प्रकाशन, रत्नागिरी, पृष्ठ क्र. ४७

११. बाबर सरोजिनी, आदिवासींचे सण - उत्सव - महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागातील प्रकाशित पृष्ठ क्र. २२